2 N.A.1204(Legal)

मा.जिल्हाधिकारी यांचेकडून अकृषिक आदेश प्राप्त करणेसाठी नाहरकत दाखला

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता.जि.ठाणे- ४०१ १०१

जा.क्र.मिभा/मनपा/नर/ 824/2012-13 दिनांक- 26/4/2012

प्रति,

जमीन/जागामालक - श्री. गुलाम मुस्तफा हाजी उस्मान व इतर
अधिकार पत्रधारक - मे. एस.के. हाईट्स प्रा.लि.
द्वारा- वास्तुविशारद - मेसर्स फडणीस अँन्ड असो.

विषय- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - महाजनवाडी
सि.टी.एस. क्र. ४२७८, ४२८५, ४२८७, ४३०२ ते ४३०५, ४३०७ ते ४३१३, ४३३० ते ४३५०, ४३८२, ४३८३, ४३८६ ते ४३९७, ४४२४ ते ४४३२, ४४३४
या जागेत नियोजित बांधकाम करण्यासाठी जागेस अकृषिक आदेश प्राप्त करणेसाठी मा. जिल्हाधिकारी यांना सादर करणेसाठी नाहरकत दाखला मिळणे बाबत.

संदर्भ- १. आपला दि.२४/०२/२०१२ चा अर्ज.
२. मे.सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील १०(३), १०(५) ची व दुर्बल घटक योजनेची कार्यवाही झालेली नसल्याबाबत विकासकाने रु.३००/- च्या स्टॅम्प पेपरवर दि.२५/०२/२०१२ रोजीचे शपथपत्र.

महोदय,

विषयांकित प्रकरणी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांतील मौजे - महाजनवाडी, सि.टी.एस. क्र. ४२७८, ४२८५, ४२८७, ४३०२ ते ४३०५, ४३०७ ते ४३१३, ४३३० ते ४३५०, ४३८२, ४३८३, ४३८६ ते ४३९७, ४४२४ ते ४४३२, ४४३४ मधील जागेस अकृषिक परवानगी प्राप्त करणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावयाच्या नकाशास खालील अटीस अधिन राहुन मंजुरी देण्यात येत आहे.

१) विषयांकित जागेस मा.जिल्हाधिकारी यांच्याकडून अकृषिक परवानगी प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ नुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३, २५४ (प्रकरण १२ सह) विहीत नमुन्यात बांधकाम प्रारंभपत्रासाठी अर्ज करण्याची व बांधकाम प्रारंभपत्र प्राप्त करण्याची जबाबदारी आपणांवर राहील. सदर नाहरकत दाखल्याची मुदत एक वर्षासाठी आहे. सदर नाहरकत दाखल्याच्या आधारे जागेवर कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करता येणार नाही, अन्यथा बांधकाम केल्यास सदरचे बांधकाम अनाधिकृत ठरवुन विहीत कार्यवाही करण्यात येईल. तसेच बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी विद्युतपुरवठा करणेबाबत महानगरपालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र घेणे आपणावर बंधनकारक राहिल.

२) बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी मंजूर रेखांकनातील नागरी सुविधा क्षेत्र महानगरपालिकेस विनामुल्य हस्तांतरीत करणे आपणावर बंधनकारक राहिल.

३) सदर जागेच्या मालकीबाबत व न्यायालयात दावा प्रलंबीत नसल्याबाबत आपण प्रतिज्ञापत्र दि.११/०१/२०१२ रोजी दिलेले आहे. याबाबत काहीही विसंगती आढळून आल्यास दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल.

४) बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी पोहोंच रस्ता विकसीत केल्याबाबतचा दाखला, अग्निशमन विभागाकडील नाहरकत दाखला, सांडपाणी व्यवस्थाबाबतचा नाहरकत दाखला, पाणीपुरवठासाठी जल वाहिनी व्यवस्थाबाबतचा नाहरकत दाखला, उद्यान व वृक्ष प्राधिकरणाकडील नाहरकत दाखला सादर करणे आवश्यक आहे. तसेच परवानगी अपेक्षिलेल्या भूखंडातून नैसर्गिक नाला असेल तर आपण सदर नैसर्गिक नाल्याचे बांधकाम करुन देणे आपणावर बंधनकारक राहिल.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत - माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव
१) मा. जिल्हाधिकारी, ठाणे
२) प्रभाग अधिकारी